जा.क्र./पोउआ/वाह/४३५० /२०२३

**प्रेसनोट** पुणे दिनांक - १६ /०६/२०२३

दि. १७/०६/२०२३ ते दि. २३/०६/२०२३ रोजीपर्यंत पुणे शहरामध्ये जी-२० परिषदेचे आयोजन केले असून त्याअंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ या ठिकाणी प्रदर्शन आयोजित केले आहे. सदर कार्यक्रमाकरीता आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यवर मोठया प्रमाणात उपस्थित राहणार आहेत. सदर मान्यवरांचे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन व वाहतूक नियमनाचे अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील वाहतूकीत बदल करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/ सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (ए) (बी), ११६ (४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पुणे शहर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील वाहतूकीत **दि. १७/०६/२०२३ रोजीपासून जी-२० परिषद संपेपर्यंत** प्रायोगिक तत्वावर खालीलप्रमाणे बदल करीत आहे.

## चतुःश्रृंगी वाहतूक विभागांतर्गत

- **सेनापती बापट रोड / गणेशखिंड रोडवरुन येऊन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातून उजवीकडे वळुन पुणे विद्यापीठ मेन गेटकडे जाण्यास तात्पुरत्या स्वरुपात परवानगी देण्यात येत आहे.**

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त,वाहतूक
पुणे शहर.

प्रति,

**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,**
**नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - १**

प्रत :-

१) **सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक** - २, पुणे शहर

२) **पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

२/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) **प्रभारी अधिकारी चतुःश्रृंगी, शिवाजीनगर** वाहतुक विभाग, पुणे शहर

४) **पोलीस निरीक्षक मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**

२/-सदरची प्रेसनोट सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व व्टिटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रातून प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

५) **पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**

२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन अहवाल सादर करावा.